म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४८१

# वल्गनाविवेचन

अथवा

# चहाकाव्य.

लेखक,

गोविंद सदाशिव आपटे एम्. ए.

प्रकाशक,

क्षीरसागर आणि कंपनी.

१९१९

REFBK-0001684
REFBK-0001684

किंमत चार आणे.

# वल्गनाविवेचन

अथवा

# चहाकाव्य.

...समप्रशंसा.

REFBK-0001684
REFBK-0001684
१६८४

...ते.

पूर्वेकडे[1] मी उदयास आलों ॥
मी पश्चिमेला अति दूर गेलों ॥
अमूनियां येथ परार्थ ठेलों ॥
साधूनि कार्या कृतकृत्य झालों ॥ १ ॥

चैतन्य[2] लोकीं पसरावयाला ॥
माझा जगीं या अवतार झाला ॥

---

१ चीन देशांत. २ हुशारी.

भुजंग गाना, मधुला मिलिंद[३] ॥
तसे मला लुब्धचि लोकवृंद ॥ २ ॥

प्रभात होतां मज सेविताती ॥
मित्रां[४]परी तोषद मानिताती ॥
मध्यान्हसेवा कुणि आचरीती ॥
थोडेचि रात्रीं मज आठवीती ॥ ३ ॥

उल्लास देतो रवि पुष्करांना[५] ॥
मी हर्षवी मित्र[६]हि पुष्कळांना ॥
पात्रेंहि गाती मम योग-हर्षें ॥
आनंद कर्णीं नयनींहि वर्षें ॥ ४ ॥

### वंशस्थ.

प्रभातकर्में नरनारि सांडिती ॥
मदंश वक्त्रीं मधुरोष्ण सोडिती ॥
गमे सदा वांछिति मत्सुसंगती ॥
व्रजांगना[७] कृष्णपदींच रंगती ॥ ५ ॥

### भुजंगप्रयात.

पयः, शर्करा, लाडु, सांजा, चपाती, ॥
पुऱ्या, दाडिम, पोहे, कचित् लोक खाती ॥

---

३ भ्रमर. ४ सूर्याप्रमाणें. ५ कमळांला. ६ सूर्य.
७ गोपी.

अहो लाभ माझा सुधा मानिताती ॥
पहा निर्मिली म्यां दुजी लोकरीती ॥ ६ ॥

गमे, व्यर्थ आतिथ्य, ऐसें मनाला ॥
न मी त्यांत होतांचि, आतां जनांला ॥
किती भारिलें लोक म्यां सेवनानें ॥
किती जोडिला स्नेह या साधनानें ॥ ७ ॥

वसंततिलका.

व्याही, विहीण, वर्पक्षि नराश्वदास ॥
माझ्याविना रुसति, होति मनीं उदास ॥
पार्टी कधीं करि कुणी जइ ग्यादरिंग ॥
मद्योजना प्रथम शोभतसे अभंग ॥ ८ ॥

उपजाति.

माझी असे भारतिं या प्रतिष्ठा ॥
आहे युरोपांत विशेष निष्ठा ॥
अमेरिकेमाजिं न ती कनिष्ठा ॥
वेडाविलें मीं बहुतां वरिष्ठां ॥ ९ ॥

जलोद्धतगति.

तुरंग थकतो, प्रतोदं बघतो ॥
तदा चमकतो, सवेग पळतो ॥

---

८ नवऱ्याच्या बाजूचे. ९ खात्रीची. १० चाबूक.

पुन्हां थकत, त्या कशीं[10] सडकितो ॥
जलोद्धतगतीपरी उसळतो ॥ १० ॥
तसे जन किती मला जइं पिती ॥
सशक्त बनती, सतेज दिसती ॥
श्रमा करुनि ते पुन्हांहि दमती ॥
पुन्हां मम सुसेवनेंचि खुलती[11] ॥ ११ ॥

मिळे न जरि शर्करा, न अडती ॥
तदा गुड मम द्रवीं मिसळती ॥
विदाह[12] जरि हो, तरी न डगती ॥
दिनींच दुसऱ्या स्मृती विसरती ॥ १२ ॥

## शार्दूलविक्रीडित.

दारिद्र्यें जरि गांजिलें, न पुरतें पोटा मिळालें जरी ॥
ल्याया वस्त्र नसे, सदा कण्हतसे भार्याहि रोगी घरीं ॥
पोरें जाति बिदीवरी[13], धन नसे त्यां शिक्षणा द्यावया ॥
माझे भक्त अनेक युक्ति करिती मद्योग साधावया ॥

## पृथ्वी.

सुवृद्ध, विधवा स्त्रिया, मजासि लोकही धार्मिक ॥
पवित्रतम मानिती अमित शास्त्र ते वैदिकें ॥

---

१० चाबूक. ११ हुशार दिसतात. १२ उष्णता. १३ रस्त्यावर.

निषिद्ध वर्यां[१४] उपोषणदिनीं बटाटे कुणी ॥
तसे म्हणति साबुंही[१५], मज तसें न कोणी गणी ॥ १४ ॥

प्रवासिं जवळीं जलाग्निसह दुग्ध, मी, शर्करा ॥
नसूं; तरिहि संकटें भिववितीं न मत्किंकरा[१६] ॥
अजूस परगांवही बघुनि जाति ते; वांकडें ॥
करूनि मुख मागती पयहि पात्र वा लांकडें ॥ १५ ॥

प्रसन्न मज सेवुनी मजल मारण्या होति ते ॥
उशीर जरि हो, क्षुधा नच अशक्तता आणिते ॥
बरें, जरि निशीं कुणा कधिं न झोंप येई तदा ॥
ममामृतसुसेवनें शिणवटा न भासे कदा ॥ १६ ॥

## वसंततिलका.

मद्दास जो मजसि मानि अपूर्व मेवा ॥
लोभें कधीं कधिं करी जन नीचसेवा ॥
थोडयांत तृप्ति न तया, मग लाज सोडी ॥
तो याचनाहि करि दुर्गुण अन्य जोडी ॥ १७ ॥

हॉटेल, रेल मजसंगति जातिभेद ॥
मोडावया झटति ते न गणोनि खेद ॥
मातें धुरीणपदें[१७] अर्पिति, जाणती ते ॥
साह्याविना मम न कार्य यशस्वि होतें ॥ १८ ॥

---

१४ वऱ्याचे तांदूळ. १५ साबुदाणा. १६ माझा दास. १७ पुढारीपण.

त्यागावया मज कुणी जरि इच्छितातीं ॥
त्यांना निरर्थ बहुधा श्रम फार होतीं ॥
माझ्यापरीच रसनेंद्रिय तोषवाया ॥
ते योजिती प्रतिनिधी[१८], परि जाति वायां॥१९॥

कल्याण मी करितसें मम सेवकांचें ॥
त्यांच्या पुढील पिढिचें सुतबालिकांचें ॥
कित्येक त्यां वणिज देश-विदेश-वासी ॥
केले धनी, अमित लोक पहा विलासी ॥ २० ॥

शार्दूलविक्रीडित.

माझें वर्णन फार काय करूं मी? त्यां बायका नाडिल्या॥
मत्प्राप्तीविण गेहिं काम करण्या कित्येक त्या आडल्या॥
माझें त्यांसि वियोगदुःख पुरुषांपेक्षां मनां पीडितें ॥
ज्यांना मी प्रिय, त्यां न बाधिति अशीं शार्दूलविक्रीडितें

## ( २ ) शंकासमाधान.

वसंततिलका.

ऐसें असोनि बुध निंदिति कांहिं मातें ॥
हा रोगकंद[१९], हटवा बहु दूर यातें ।

---

१८ दुसरे पदार्थ. १९ रोगांचें मूळ.

दाह ज्वरींर्श करि शूल शिरीं, शरीरीं ॥
निद्रार्ति पित्त-रुधिरादिविकारकारी ॥ २२ ॥

पृथ्वी.

किती दिसति पांडुरप्रभे मुखीं प्रसूत स्त्रिया ॥
क्षयावरणें आणि त्यां वदति वैद्य माझी क्रिया ॥
न कोणि कधिं डाक्टरादिक मला "हरी व्याधि हा"॥
असें स्तविति, सेविती जरि मला सदा ते अहा!॥२३॥

हरिणी.

खचित मजला वाटे, यांना कृतघ्नपणामुळें ॥
जन विसरती कार्या-अंतीं, सदा यश ना मिळे ॥
परि मम सखे रोगी त्यागावया मज सज्ज न ॥
म्हणुनि ह्मणें ते मोक्षा जाती पहा तुह्मि सज्जन॥२४॥

मंदाक्रांता.

ऐशीं कांहीं मम शुभयशा काळिमा आणणारीं ॥
विघ्नें येती, परि मम मती नाहिं त्यांतें भिणारी ॥

२० अर्श म्ह० मूळव्याध. २१ आर्ति म्ह० पीडा. निद्रार्ति चांगली झोंप न येणें. २२ रक्तादिकांचे. २३ फिकट तेजाच्या. २४ क्षयाची छाया. २५ माझें सेवन करून मला चांगलें ह्मणत नाहींत या कृतघ्नपणामुळें. २६ गरज सरो वैद्य मरो असें म्हणतात तें माझ्या शापाचें फळ होय. २७ तयार.

त्यागी कोणी मजसि जरि, ते अन्य कित्येक संत ।।
भातें कंठीं[२८] धरिति[२८], बहु मी शिक्षितांना पसंत ॥२५॥

## वसंततिलका.

कोणी म्हणे, मज अफूजल-पूट देती ॥
तेणेंच तीः[२९] मंदकला मम ठायिं येती ॥
कोणी अशास्त्र मम सेवन मानिताती ॥
मद्भक्त तर्क परि हे मनिं नाणिताती ॥ २६ ॥

## रथोद्धता.

भक्त मानिति मला गुणाकर[३०] ॥
स्फूर्तिशक्तिदचि योग्य चाकर ॥
सांगती, मज न सेविती कधीं ॥
तेहि पावति मृती, जरी सुधी ॥ २७ ॥

दोष जे मजमधेंच भासती ॥
कारणें बहु तिथेंहि दीसती ॥
सर्वदुर्गुणखनी[३१] कुणी मला ॥
बोलती, परि कळे न त्यांजला ॥ २८ ॥

कार्य–कारण–परंपरा किती ॥
भिन्न खोल असते जगांत ती ॥

---

२८ घशांत सोडितात, म्ह० पितात. २९ उत्तेजकता. ३० सद्गुणाची खाण. ३१ खाण.

सर्व सुज्ञ मजला न वारिती ॥
मी प्रमाणचि असें निवारि ती[32] ॥ २९ ॥

उपजाति.

वकील माझे बहुलोकमान्य ॥
तेणें जगीं मी ह्मणवीत धन्य ॥
माझी न पावे सरि कोणि अन्य ॥
रोगप्रदानीं जरि मी वदान्य[33] ॥ ३० ॥

प्रहर्षिणी.

मद्दोषां उकलुनि जे सुमार्गिं लोकां ॥
आणाया शकति, शिकावया विवेका, ॥
तद्वक्त्रा मधुर करीत मी सदैव ।।
त्यांचे ना प्रतिकुल बोल हें सुदैव ॥ ३१ ॥

शालिनी.

कांग्राव्हॅली ती पिकोडस्ट, बुंद ॥
कॉफी, कोको, साह्यकारी[34] सुवृंद ।[
माझ्या बोला पुष्टिदायीच साचा ॥
गर्जे लोकीं दुंदुभी मद्गुणांचा ॥ ३२ ॥

---

३२ सर्व दुर्गणांची मी खाण आहें अशा प्रकारची.
३३ उदार. दाता. ३४ माझ्याप्रमाणेंच गुणकारी.

## ( ३ ) वस्तुस्थिति.

### भ्रमरविलसित.

एवं लिप्टनूटिन[35] टनामितिचे[35] ॥
दर्पोक्तीनें निजवीर[36]-कृतिचें ॥
गातां स्तोत्र श्रवणिं परिशिलें ॥
म्यां चित्ताला मग हळु पुशिलें ॥ ३३ ॥

### स्त्रग्विणी.

वल्गना हीं, मना, सत्य किंवा कसें ॥
सांग निःपक्षपाती विवेका पुसे ॥
येति दोघे यदा आत्म[37]शुद्धीवरी ॥
श्रेष्ठ हें ठाकलें सत्य बुद्धीवरी ॥ ३४ ॥

### मालिनी.

खचित अजि चहाचें माजलें स्तोम फार ॥
व्यय फुकट तयाच्या पायिं होतो अपार ॥
अबुध[38] विबुध कैसे पेय-पाशांत सारे ॥
हर हर ! फसतां हा नाश होतो कसा रे ॥ ३५ ॥

---

३५ टनूच्या टन वजनांचे लिपटन् चहाचे डबे. ३६ आपल्या श्रेष्ठ पराक्रमाचें. ३७ स्वतःच्या भानावर. ३८ अडाणी.

## शालिनी.

बी. ए. एम्. ए. लोक लब्धप्रतिष्ठ ॥
वेदाध्यायी, शास्त्रि, नारी, सुशिष्ट ॥
श्रेष्ठाश्रेष्ठज्ञाति, विद्यार्थि, तुष्ट ॥
चाहा-पानें; सुज्ञ मानी अनिष्ट ॥ ३६ ॥

## शिखरिणी.

चहा रोजीं घ्याया धन न जरि द्याया, कुललना ॥
दुज्या वस्तू देती लपवुनि, न भीती मुळिं मना ॥
वदों लागे खोटें, पतिस बहु तोटे करि ऋणी ॥
पडे सौख्यीं माती, लवणकण जाती शिखरणी[३९] ॥३७॥

## वसंततिलका.

गांजा, तमाखु, अफु, मद्य बरें म्हणावें ॥
त्यांच्याकडे जन चहापरि तो न धांवे ॥
अज्ञान, दृष्टि, रुचि, आग्रह मुख्य पाश ॥
रीसापरी[४०] हंसवुनी करिती विनाश ॥ ३८ ॥

## हरिणी.

व्यसनिं दुसऱ्या होती, ते तीं दुज्यांसि न लाविती ॥
कथुनि तनुजां बोधें, क्रोधेंहि दूरचि ठेविती ॥

---

३९ दूधकेळांची शिकरण करितात तिच्यांत. वृत्ताचें सूचक. ४० अस्वलाप्रमाणें.

परि, जन चहा देती, घेती, सुसंमत रीति ती ॥
द्विपद[४१] हरिणां[४१] फांशी[४२] हा शीघ्र त्या हरिणी किती ॥

## स्वागता.

चीनदेशिं अफु पूर्वज[४३]-दोषें ॥
राष्ट्र-हानि करि, पाहुनि रोषें ॥
श्रेष्ठ दंड[४४] करिती, विपदांतें ॥
युक्तिनें हरति ते सुखदाते ॥ ४० ॥

## वसंततिलका.

हा मंद-वेग-विष[४५] सर्प[४६], गळयांत हार ॥
जाणोनि कंठिं करिती परिधान धीर ॥
त्या ओळखीति न कितीक खचीत वाटे ॥
मोठे जरि शिथिल[४७], होतिल फार तोटे ॥ ४१ ॥

## द्रुतविलंबित.

करिति सुज्ञ सुरा[४८]व्यसनीं जनीं ॥
कमति, दुःख जनाग्रणि[४९] सोसुनी ॥

---

४१ दोनपायांच्या हरिणांना व हरिणींना म्ह० नरांना व नारींना. ४२ स्वतःच्या फासांत अडकावितो. ४३ पिढ्यानूपिढ्या चालत आलेल्या अफूच्या सेवनानें ४४ अफू विकणारांस व घेणारांस शिक्षा ठरविल्या आहेत. ४५ ज्याच्या विषाचा परिणाम हळूंहळूं दृष्टीस पडतो असा सर्प. ४६ हा सर्प असून यास हार समजतात. ४७ या गोष्टीसंबंधीं उदासीन. ४८ दारूचें व्यसन ४९ लोकांचे पुढारी.

१६८४

परि चहारत ते इतरां कसे ॥
वळविण्या क्षम[50] होतिल फारसे ॥ ४२ ॥

## स्वागता.

लोकनायक मुके[51] निजदोषें ॥
हीनवीर्य युव होति विशेषें ॥
देश होइ बहु दुर्बल यानें ॥
हा सुनीति–गृह–सौख्य लया ने ॥ ४३ ॥

## उपजाति.

व्याधी चहा जैं करि कष्ट-साध्य ॥
" चहा त्यजाना, तरि हो असाध्य " ॥
वैद्योक्ति ही त्रासविते मनाला ॥
कीं इंद्रवज्राहत[52] जीव झाला ॥ ४४ ॥

## भुजंगप्रयात.

चहा-राहुनें ग्रासिलें कृष्णवर्णें ॥
बलारोग्य–पूर्णेंदुला या विवर्णें ॥
सुभावांत रोवी तमोगूण[53] पाय ॥
करावा अतां काय याला उपाय ॥ ४५ ॥

५० समर्थ. ५१ उपदेश करण्याला असमर्थ. ५२ जणूं काय इंद्रवज्रच पडलें अशा प्रकारचा. ५३ तामस गुण.

## ( ४ ) शास्त्रीय विवेचन.

### पुष्पिताग्रा.

तरवडजळिं[54] ढोर चर्म ठेवी ॥
कर्मविहि[54] बाभळिच्या जळांत तेंवी ॥
सहजें[55] मुदुपणा[55] त्यजी त्वचा ती ॥
चिंवटपणादि दुजेचि धर्म येती ॥ ४६ ॥

वसत गुण चहांत[56] बाभळीचा[56] ॥
करि जठरासि कठोरचर्म-साचा[57] ॥
पचनरस नये सुखें तयांत[58] ॥
मग कुजतें हळुं आमें[59] अन्न आंत ॥ ४७ ॥

---

५४ कातडी कमविणारे ढोर लोक तरवडाच्या किंवा बाभळीच्या सालींच्या पाण्यांत कातडीं ठेवून कमावितात. ५५ मूळचा मऊपणा. ५६ बाभळीच्या पाण्यांत जे गुण आहेत तेच चहांत आहेत. दोहोंमध्यें टॅनिन हेंच बाधक द्रव्य आहे. ५७ कमाविलेलें कातडें जसें कठोर व चिंवट होतें, त्याप्रमाणेंच आपल्या जठराच्या पिशवीचें कातडें चहाच्या सेवनानें हळूंहळूं कठोर होतें. ५८ यामुळें बाहेरून कोष्ठांत जाणारा पाचक र स ( Pancreatic juice ) पूर्वींप्रमाणें सहज कोष्ठांत जात नाहीं. ५९ कच्चें.

## माल्यभारा.

पचनांस अवश्य होय लाळीं[६०] ॥
निज दोषी करि दुष्ट पेय-माळीं[६१] ॥
रसनेंद्रियतीक्ष्णता विलापे[६२] ॥
मग तो मांद्यविकार[६३] कां न कोपे ॥ ४८ ॥

## प्रभावती.

चहाविषें जठरिं कीट[६४] हळूं जमे ॥
करीं पदीं, नयनिं विदाहतां[६५] गमे ॥
क्षुधा मरे, कुचितमळें[६६] शिर भ्रमे ॥
दमा जडे सहजि[६७] जीव दमे श्रमें ॥ ४९ ॥

## द्रुतविलंबित.

युव चहा ह्मणती न च बाधतो ॥
परि न ये वचना ॠत[६८] बाध तो ॥
नुमजती इसबासम[६९] वाढ तो ॥
कुपच-रोग हळूंहळुं वाढतो ॥ ५० ॥

---

६० लाळ. ६१ चहादि दोषकारक पेयांची मालिका. ६२ नाहींशी होते. ६३ मंदाग्नीचे विकार. ६४ बारीक किटण. ६५ आग, उष्णता. ६६ अशुद्ध सांचलेल्या मळानें. ६७ लवकर. ६८ चहा बाधतो या खऱ्या वचनाला. ६९ इसबरोगाप्रमाणें.

## रथोद्धता.

तीन चार रति[७०] वीषँ[७१] चहाचें ॥
श्वान, ओतुँ[७२] नच खाउनि वांचे ॥
तीन कर्षचि  चहांत असे तें ॥
मारण्या विष पुरें मनुजातें ॥ ५१ ॥

## शार्दूलविक्रीडित.

लागावी जशि सृष्टीच्या सुनियमें
जेव्हां क्षुधा ती तशी ॥
लागेना तरि लाभ तो न, समजा
ही हानि मोठी अशी ॥
झालां स्वार्थविवेकशून्यचि चहा-
योगें, तया वानितां ॥
" जागे व्हा, " उपदेशिती जरि सुधी,
आश्चर्य, त्यां निंदितां ॥ ५२ ॥

## स्वागता.

लोभवी रुचि, म्हणोनि चहातें ॥
घेति, ते न बल-सौख्य-चहाते ॥
दीर्घ भोगँ[७४] जडवी व्यसनाला ॥
सिद्ध होति मग ते मरणाला ॥ ५३ ॥

---

७० गुंजा. ७१ चहांतील टॅनिन. ७२ मांजर. ७३ तोळे. ७४. सेवन.

## वसंततिलका.

कांहीं जरी शरिरिं ये तकवा चहानें ॥
ना तो टिकाउ, खरि शक्ति न येइ त्यानें ॥
जो अश्व खाउनि कशा उचली पदां, तो ॥
हो श्रांत सत्वरि, अती थबके पुन्हां तो ॥ ५४ ॥

तो अश्व भक्षुनि चणे जइं पुष्ट होई ॥
तेव्हां स्वतां द्रुतगती पथिं शीघ्र जाई ॥
जी शक्ति ये सहजि पौष्टिक अन्नपानें ॥
ती श्रेष्ठ ये नच चहादिक-सेवनानें ॥ ५५ ॥

## शार्दूलविक्रीडित.

धान्यासी कुजवूनि मद्य करिती,
चाहा-दलां त्यापरी ॥
ठेवोनि सडवीति, अॅम्ल करिती,
ये फेस त्यांचेवरी ॥
होई आसवं, त्यांसि येइ बुरशी,
उत्पत्ति त्यांची अशी ॥
सांगा चालुति का उपोषण-दिनीं
तीं सोंवळयाला तशीं ॥ ५६ ॥

---

७५ लवकर लवकर चालून. ७६ आंबवितात. ७७ दारू.

### रथोद्धता.

शीत देशिंहि चहासि सेवितां ॥
दीर्घ कालिं शरिरीं जडे व्यथा ॥
मूर्तिमंत-विकृती-समान तो ॥
उष्णदेशिं सहसा न मानतो ॥ ५७ ॥

### वंशस्थ.

सुवृष्टिकाळीं जइं शैत्य भासतें ॥
तसें व्यथा दे पडसें शिरास तें ॥
तदा चहा स्वेदसुखार्थ सेवणें ॥
न योग्य जिव्हेसि सदा चटावणें ॥ ५८ ॥

### वसंततिलका.

अन्नांश आंत नसतांहि चहासि भारी ॥
बोलावुनी स्वतनुजासहि देति नारी ॥
ज्ञाते सुबुद्ध नरही किति या परींचे ॥
आश्चर्य हें परम, अन्य न या प्रतींचें ॥ ५९ ॥

## कर्तव्य व प्रार्थना.

### शिखरिणी.

चहापायीं होतो व्यय, गद हराया मग किती ॥
तया चित्तीं जाणा, सुमति मनिं आणा गणति तीं॥

तथा द्रव्यें कार्यें कितिक दुसरीं श्रेष्ठ घडती ॥
जगीं पैशासाठीं श्रम किति पहा लोक करिती॥६०॥

## उपेन्द्रवज्रा.

परी चहा टाकुं शके न रोगी ॥
सदैव तो क्लेश अनंत भोगी ॥
असत्य बोले नच पथ्य पाळी ॥
अकाळिं त्याच्या मृति[७८] ये कपाळीं ॥ ६१ ॥

## पुष्पिताग्रा.

पद जरि अनलीं पडे, तरी तो ॥
दहन करी, अणुं न क्षमा करी तो ॥
अनुभवाचि, चहा उगा न राही ॥
पचन विनाशि, न सानँ थोर पाही ॥ ६२ ॥

## शालिनी.

चहा सोडणें शक्य हो निश्चयानें ॥
मिटे त्रास अत्यल्प काळीं, तयानें ॥
शिरी शूल, कर्णांत आवाज होई ॥
कधीं दंतपीडा निरुत्साह देहीं ॥ ६३ ॥

---

७८ मरण. ७९ थोडीसुद्धां. ८० लहान. ८१ चहा सोडण्याचे वेळी त्रास होतो त्याच्या योगानें.

चहा सेवण्याची जई वेळ येई ॥
सदा उद्यमीं दूर बा मग्न होई ॥
अकस्मात चाहासि सोडोनि द्यावें ॥
न तद्वर्ग-पेयांसि तोषार्थ घ्यावें ॥ ६५ ॥

दहा वीस वर्षांहि घेती चहातें ॥
अशा युक्तिनें चौदिनीं सुज्ञ यातें ॥
तिरस्कारुनी टाकिती, दाविती ते ॥
चमत्कार लोकां, खरे धीर हो तें ॥ ६६ ॥

मालभारी.

जरि रोग टळे असेवनानें ॥
तरि सोडा झणि हो चहादि पानें ॥
क्षण-सौख्य मिळोनि दीर्घ सौख्या ॥
मुकणें या उपमा नसेचि मौर्ख्या ॥ ६७ ॥

वसंततिलका.

भाजा गहूं वरति कृष्णचि वर्ण यावा ॥
द्या त्यांसि बारिक कुटूनि दळूनियां वा ॥
त्या पांच चार मिनिटें मग शीजवावें ॥
दुग्धादि कॉफिपरि घालित त्यांत जावें॥ ६८॥

२ त्याच्या जातीचीं इतर पेयें.

स्वादिष्ट हें रुचिर कॉफिपरीच घ्यावें ॥
किंवा चहा गवति घालुनि पेय प्यावें ॥
सर्वांत उत्तमचि पौष्टिक अन्न खावें ॥
चाहादि दोषकर, त्यांसि सदा त्यजावें ॥ ६९ ॥

उपजाति.

अनंतमूळादिक अन्य पेय ॥
घेतां खरा हेतु न सिद्ध होय ॥
न उष्णतोयापरि पेय अन्य ॥
सत्कार्य कोष्ठीं करि दोषशून्य ॥ ७० ॥

परावलंबीच चहादि पानें ॥
तीं टाकुनी अन्नचि खा सुखानें ॥
हें खूळ पूर्वीं नव्हतें चहाचें ॥
तदा न कांहीं अडलें कुणाचें ॥ ७१ ॥

मंदाक्रांता.

पाश्चात्यांचें अनुकरण ना स्तुत्य कोणी म्हणे हें ॥
चाहापानें, अशनवसनें, सद्गुणप्राप्ति नोहे ॥
मद्यादींच्या व्यसनिं असती त्यांसि हाही न सोडी ॥
मंदाक्रांती[८३] अचिर करि हा, यास ही दुष्ट खोडी ॥७२॥

८३ मंद ह्मणजे स्वतःच्या मनावर दाब नसलेल्या मनुष्यावर हा चहा आक्रांत करितो ह्मणजे त्यास आपले झपाट्यांत घेतो. वृत्ताचा सूचक शब्द.

२६८४

## प्रभावती.

अहो वीरा[८३] सुमति[८४], मनासि आंवरा ॥
जनां उदाहरणें[८५]–गुणोंचि सांवरा ॥
चहा–व्यथा अमित जनांसि बाधते ॥
मनोबलें न कठिण काय साधतें ॥ ७३ ॥

## उपजाति.

धार्मिष्ट नारीनर या निषिद्ध[८६] ॥
चहासि घेवोनि न व्हा अशुद्ध ॥
स्मरूनि तद्दोष जगीं प्रसिद्ध ॥
स्पर्शा न त्या धार्मिक हो सुबुद्ध ॥ ७४ ॥

## मालिनी.

कितिक म्हणति आतां ना हटे हा प्रसार ॥
स्वहित तरि पहावें व्यक्तिनीं, यांत सार ॥
स्वगत वरिल[८७] उक्ती ध्यानिं आणा चहाची ॥
शपथ वदुनि सोडा त्या क्षणीं मार्ग हाची ॥७५॥

---

८४ चांगली बुद्धि धरा. ८५ स्वतःच्या उदाहरणानें. ८६ अशुद्धता जी मागें ५६ वे पद्यांत वर्णिली आहे ८७ आत्मप्रशंसा व शंका समाधान या दोन प्रकरणांत सांगितलेली.

स्रग्धरा.

कल्याणेच्छा स्वभावें खग, पशु, धरुनी
बालसंगोपनार्थी ॥
प्रीतीनें आत्मजाची रुचि न जडविती
दुर्विपाकीं पदार्थी ॥
सुश्रेष्ठ प्राणि आह्मी असुखद संवयी
लावितों अर्भकांनीं ॥
क्षाळू या लांछनातें त्यजुनि, कथुनि त्यां,
दुष्ट चाहादिकांना ॥ ७५ ॥

## प्रार्थना.

शार्दूलविक्रीडित.

आहो डॉक्टर वृद्ध वैद्य जनकादि श्रेष्ठ ही प्रार्थना ॥
कीं, दुष्ट व्यसनांतुनी गुरुपणें हो वांचवावें जनां ॥
घ्या भावार्थ मनांतही पठुनि वा ऐकोनि पद्यावली ॥
चाहा-काव्य-कवी नमी शिवपदां गोविंद बद्धांजली ७६

---

८८ आपल्या मुलांचें संगोपन चांगलें व्हावें अशी इच्छा करणारे. ८९ आपल्या मुलांची ९० वाईट परिणाम होणाऱ्या. ९१ मुलांना.

# फलश्रुति.

## चामर.

मान्य होय, जो पठे चहा-सुकाव्य हें सदा ॥
आचरील[९२], तो हरील देश-दैन्य आपदा ॥
गाति यासि ते मनासि रंजवूनि तोषिती ॥
तोषवीतिही, सदूपदेशवृत्ति[९३] पोषिती ॥ ७७ ॥

REFBK-0001684
REFBK-0001684
१६८४

९२ जो आचरणांत आणील. ९३ दुसऱ्यास चांगला उपदेश करण्याची प्रवृत्ति.

हें पुस्तक श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस, ४०२, ठाकुरद्वार मुंबई, येथें अनंत आत्माराम मोरमकर, यांनीं छापून यशवंत रघुनाथ क्षीरसागर यांनीं भायखळा हेन्सरोड नं. २१४. मुंबई येथें प्रसिद्ध केलें.